# वसई-विरार शहर महानगरपालिका
## क्रीडा विभाग

---

दि.१६/०८/२०२२

## <u>जाहीर आवाहन</u>

"गोपाळकाला" दहीहंडी उत्सव दि.१९ ऑगस्ट २०२२ रोजी साजरा केला जाणार आहे. या उत्सवात विविध गोविंदा पथके उत्साहाने भाग घेत असतात. गोविंदा पथकांची उत्सवामधील जोखीम लक्षात घेऊन वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत दहीहंडी पथकातील सर्व गोविंदाचा अपघात विमा काढणे बाबत योजना दि.०९ ऑगस्ट, २०२२ पासून सुरु करण्यात आली असून गोविंदा पथकातील गोविंदाचा विमा काढणे बाबतचे फॉर्म जमा करून घेतले जात आहेत.

या विमा योजनेचा लाभ घेण्याकरिता अंतिम मुदत ही १७ ऑगस्ट, २०२२ ही असून महानगरपालिका क्षेत्रातील सर्व गोविंदा पथकांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे कि, बुधवार दि.१७ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, पहिला मजला, क्रीडा विभाग येथे गोविंदा अपघात विमा योजनेचे फॉर्म जमा करावेत. ही विनंती.

अधिक माहितीसाठी ०२५०-२५२५१०५ या क्रमांकावर संपर्क करावा.

**क्रीडा विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**